महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार









छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ११२ वे | दिनांक : १७/०४/२०२६ | वार : शुक्रवार


## नाशिक टी.सी.एस. धर्मांतर प्रकरण : सर्वोच्च न्यायालयात याचिका, सक्तीच्या धर्मांतराला राष्ट्रीय सुरक्षेचा धोका असल्याचा दावा



**मुंबई :** "नाशिक TCS मधले हे केवळ धर्मांतर नाही, तर राष्ट्राविरुद्ध रचलेला एक सुनियोजित डाव आहे," असा गंभीर आरोप सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत करण्यात आला आहे. या प्रकरणाने संपूर्ण देशाची सद्सद्विवेकबुद्धी हादरल्याचा उल्लेखही या याचिकेत करण्यात आलाय. नाशिक TCS प्रकरणाने देशभर हलकल्लोळ माजवला आहे. हे सक्तीचे किंवा फसवणुकीने होणारे धर्मांतर ही केवळ धार्मिक बाब नसून राष्ट्रीय सुरक्षेला धोका आहे, असे सांगणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. धर्मांतराशी संबंधित एक स्वयं-प्रेरित (suo motu) प्रकरण यापूर्वीच सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. आता नाशिक टीसीएस प्रकरणासंदर्भात त्याच प्रकरणात एक नवीन याचिका दाखल करण्यात आली आहे. याचिका दाखल करणाऱ्या वकिलाने न्यायालयात सांगितले की, नाशिकमधील संघटित धर्मांतराचे हे प्रकरण संपूर्ण राष्ट्राच्या सदसद्विवेकबुद्धीला धक्का देणारे आहे.

सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत अनेक महत्त्वपूर्ण दावे आणि मागण्या करण्यात आल्या आहेत. पहिली गोष्ट म्हणजे, सक्तीचे किंवा फसवणुकीचे धर्मांतर देशासाठी एक गंभीर धोका आहे. दुसरी गोष्ट म्हणजे, जेव्हा हे एका मोठ्या, संघटित आणि जबरदस्तीच्या मोहिमेचा भाग म्हणून घडते, तेव्हा त्याला "दहशतवादी कृत्य" मानले पाहिजे. तिसरी गोष्ट म्हणजे, असे म्हटले आहे की सक्तीचे किंवा फसवणुकीचे धर्मांतर ही एक वेगळी धार्मिक घटना नसून एक "सुनियोजित कट" आहे.

याचिकेत असा दावा करण्यात आला आहे की या कटासाठी अनेकदा परकीय शक्तींकडून निधी पुरवला जातो. याचा उद्देश देशातील धार्मिक लोकसंख्येचे संतुलन बदलून भारताची एकता, अखंडता आणि सुरक्षेला धोका निर्माण करणे हा आहे. या याचिकेत असेही म्हटले आहे की, धर्म स्वातंत्र्याचा अधिकार असला तरी, हे स्वातंत्र्य सार्वजनिक सुव्यवस्था आणि नैतिकतेच्या अटींच्या अधीन आहे. याचा अर्थ असा की, या स्वातंत्र्याच्या नावाखाली सक्तीने किंवा फसवणुकीने धर्मांतर केले जाऊ शकत नाही.

याचिकेत सर्वोच्च न्यायालयाकडे दोन प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. पहिली मागणी अशी आहे की, केंद्र सरकार आणि सर्व राज्य सरकारांना फसवणूक किंवा बळजबरीने होणारे धर्मांतर रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात यावेत. दुसरी मागणी अशी आहे की, केंद्र आणि राज्य सरकारांना धर्मांतराच्या प्रकरणांची सुनावणी करण्यासाठी स्वतंत्र विशेष न्यायालये स्थापन करण्याचे निर्देश देण्यात यावेत. आता यावर न्यायालय काय भूमिका घेते, हे पाहावे लागेल.

नाशिक TCS BPO कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांच्या छळवणूक आणि धर्मांतराप्रकरणी पोलिसांनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (TCS) च्या ७ अधिकाऱ्यांना बेड्या ठोकल्यात. २६ मार्च ते ३ एप्रिलदरम्यान ९ महिलांनी एफआयआर (FIR) दाखल केलेत. प्रकरणाती मुख्य संशयित निदा खान गेल्या २० दिवसांपासून फरार असून तिचा शोध अद्याप लागलेला नाही. या संपूर्ण प्रकरणाचा उलगडा होण्यासाठी निदा खानची अटक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. तिच्या अटकेनंतर या रॅकेटमागील खरे सूत्रधार आणि संभाव्य आंतरराष्ट्रीय संबंध उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तपास यंत्रणांनी तिचे आंतरराष्ट्रीय नेटवर्क असण्याचाही संशय व्यक्त केला आहे. त्यामुळे नाशिक पोलिसांसाठी हे प्रकरण अधिक गंभीर बनले असून पुढील काही दिवसांत आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

या प्रकरणातला संशयित आरोपी शाहरुखची पत्नी पहिल्यांदाच माध्यमांसमोर आली. तिने सर्व आरोप फेटाळले. धर्मांतरासारखा कोणताही प्रकार घडला नसल्याचा दावा केला. सोबतच शाहरुख सहकाऱ्यांशी फक्त थट्टा-मस्करी करायचा. त्याला केलेली अटक, पुरावे या साऱ्यांवरच तिने प्रश्नचिन्ह उपस्थित केलेत. "जर कोणासोबत इतके काही घडत होते, तर त्यांनी आधी तक्रार का केली नाही? कंपनीत मॅनेजर, वरिष्ठ अधिकारी असतात, त्यांना का सांगितले नाही?" थेट इतके मोठे आरोप करणे आणि ते मीडियात अशा प्रकारे प्रसिद्ध करणे योग्य नसल्याचे तिचे म्हणणे आहे. तिचे कुटुंब तपासात पूर्ण सहकार्य करत असून न्यायव्यवस्थेवर आपला पूर्ण विश्वास असल्याचे तिने शेवटी सांगितले. दरम्यान, या प्रकरणातील पीडितेचे तीन एफआयआर दिव्य मराठी डिजिटलच्या हाती लागलेत. ते पुढीलप्रमाणे...

पीडित महिलेने २ एप्रिल रोजी नाशिकच्या मुंबई नाका पोलीस ठाण्यात FIR दाखल केली आहे. तिच्या म्हणण्यानुसार, जून २०२५ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत ती TCS कार्यालयात असोसिएट होती. पती कामाच्या निमित्ताने पुण्यात राहतात. FIR मध्ये तिने सांगितले की, '२४ जून २०२५ रोजी मला ३ महिन्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आले. रजा मेमनचा माझ्या प्रशिक्षणाशी काहीही संबंध नसतानाही, तो माझ्या जवळ येऊन माझ्या वैयक्तिक आयुष्याबद्दल विचारत असे. तो म्हणायचा की पतीसोबत का राहत नाहीस, हनिमूनला कुठे गेली होतीस. तिथे काय केलेस, कसे केलेस. रजा मेमनसोबत शाहरुख कुरैशीदेखील होता.'

महिलेने सांगितले, 'सीनियर तौसीफ अत्तारनेही चुकीचे वर्तन केले. तोही टीममध्ये नव्हता, तरीही जवळ येऊन खाण्याबद्दल विचारायचा. अश्लील पद्धतीने विचारायचा, 'संत्री आणली आहेस का? लहान वाली आणली आहेस की मोठीवाली?' तो चेहरा जवळ आणायचा आणि स्पर्श करायचा. जेव्हा प्रश्न विचारला, तेव्हा म्हणाला, 'तुला पुढे जायचे नाही का?' पीडितेनुसार, शाहरुख कुरेशी, रजा मेमन, आसिफ अन्सारी, तौसीफ अत्तार आणि शफी शेख यांनी तिला शारीरिक आणि मानसिक त्रास दिला. हिंदू देवी-देवतांना अपशब्द वापरले, ज्यामुळे तिच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या. तिने एचआर सेलमध्ये तक्रार केली, पण कारवाई झाली नाही. तेव्हा तिने मुंबई नाका पोलीस ठाण्यात तक्रार केली.

मुंबई नाका पोलीस स्टेशनमध्ये दाखल केलेल्या तक्रारीनुसार, जानेवारी ते डिसेंबर २०२५ पर्यंत तिचे ऑफिसमध्ये लैंगिक शोषण झाले. महिला कंपनीत क्रेडिट कार्ड ग्राहकांच्या तक्रारी ऐकत असे. तिने सांगितले, 'तौसीफ अत्तार स्वतःच्या धर्माला श्रेष्ठ दाखवत असे आणि हिंदू धर्माला कमी लेखत असे. तो म्हणायचा की खरा देव तोच आहे, जो अदृश्य आहे. हिंदू धर्मात देव दिसतात, म्हणून ते खोटे आहेत.' 'डिसेंबर २०२५ ची गोष्ट आहे. मी दुपारच्या जेवणानंतर ताक पीत होते, तेव्हा तौसीफ आला आणि विचारले- 'काय पीत आहेस?' मी म्हणाले- 'ताक पीत आहे.' त्याने विचित्र नजरेने पाहिले आणि म्हणाला- माझ्याकडेही ताक आहे, प्यायला आवडेल का? असे म्हणत त्याने खासगी भागाकडे इशारा केला.'

तिसऱ्या FIR मध्ये पीडितेने सांगितले, 'मी डिसेंबर २०२४ मध्ये ऑफिसमध्ये होते. तेव्हा शफी शेख कामाच्या बहाण्याने जवळ येऊन बसला आणि जाणूनबुजून माझ्या पायाला आपला पाय घासण्याचा प्रयत्न केला. मग माझे कीपॅड वापरण्याच्या बहाण्याने चुकीच्या पद्धतीने स्पर्श केला. मी खुर्ची दूर केली, तेव्हा तो हसत निघून गेला.' 'फेब्रुवारी २०२६ मध्ये तौसीफने माझ्या धर्माला कमी लेखण्याचा प्रयत्न केला. त्याने म्हटले की कृष्णाने १६ हजार महिलांशी लग्न केले, यावरून कृष्ण कसे होते हे कळते. भगवान शंकरांना हे माहीत नव्हते का की गणेश पार्वतीचे पुत्र आहेत? जर माहीत नव्हते तर देवी पार्वतीला पुत्र कसा झाला? त्यांनी गणेशाचे शीर का कापले?'

## जी. श्रीकांत पुन्हा छत्रपती संभाजीनगरमध्ये, विभागीय आयुक्त म्हणून रुजू होणार



**मुंबई :** राज्य प्रशासनामध्ये सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा सिलसिला सुरूच आहे. कालच पाच अधिकाऱ्यांच्या बदली केल्यानंतर आज (16 एप्रिल) पुन्हा सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगर विभागाच्या आयुक्तपदी जी. श्रीकांत यांची नियुक्ती करण्यात आली असून, एकूण 4 आयएएस (IAS) अधिकाऱ्यांची नवीन पदस्थापना करण्यात आली आहे. या बदल्यांमुळे महसूल, सिडको आणि जीएसटी विभागातील प्रशासकीय समीकरणे बदलली आहेत. सलग दुसऱ्या दिवशी बदल्या करण्यात आल्याने प्रशासकीय कर्मचाऱ्यांमध्ये चर्चांना उधाण आले आहे.

1. जी. श्रीकांत (IAS: 2009) : विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर

जी श्रीकांत हे सुरुवातीला छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त होते. १५ दिवसांपूर्वीच त्यांची नवी मुंबई येथे 'जल जीवन मिशन'चे अभियान संचालक म्हणून बदली झाली होती. मात्र, जी. श्रीकांत पुन्हा छत्रपती संभाजीनगरमध्ये बदली होऊन येणार असून, यावेळी त्यांच्याकडे मराठवाडा विभागाचे विभागीय आयुक्त म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.

जी श्रीकांत हे गेल्या पाच वर्षांपासून छत्रपती संभाजीनगर शहरांमध्ये आधी जीएसटी आयुक्त आणि महानगरपालिका आयुक्त, प्रशासक म्हणून कार्य केले आहे. त्यापूर्वी ते मराठवाड्यातील लातूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहिलेले आहेत.

2. जितेंद्र पापळकर (IAS: 2010) : सह आयुक्त, जीएसटी, मुंबई

छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त म्हणून कार्यरत असलेले जितेंद्र पापळकर यांची बदली आता सह आयुक्त, जीएसटी, मुंबई या पदावर करण्यात आली आहे. गेल्या काही काळापासून संभाजीनगर विभागाच्या विकासासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले होते.

3. गंगाथरन डी. (IAS: 2013) : अभियान संचालक, जल जीवन मिशन

गंगाथरन डी. यांची नियुक्ती अभियान संचालक, जल जीवन मिशन, नवी मुंबई या पदावर करण्यात आली आहे. जी. श्रीकांत यांच्या बदलीनंतर रिक्त झालेल्या या महत्त्वाच्या पदाची जबाबदारी आता गंगाथरन यांच्याकडे असेल.

4. जगदीश मिनियार (IAS: 2015) : आयुक्त, महिला व बालविकास, पुणे

छत्रपती संभाजीनगर येथील सिडकोचे (नवी शहरे) मुख्य प्रशासक म्हणून कार्यरत असलेले जगदीश मिनियार यांची आता पुणे येथे महिला व बालविकास विभागाच्या आयुक्तपदी बदली करण्यात आली आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १७ एप्रिल २०२६


## उंदीरमामाचा आजार

गारठणाऱ्या थंडीत
बिळाबाहेर आला उंदीरमामा
अंगात नव्हते स्वेटर
नव्हती कशाची तमा

सकाळी सकाळी
हवा होती गार
खोकलून खोकलून
झाला तो बेजार

दुखू लागले डोके
झाली त्याला सर्दी
बिळातल्या मित्रांची
झाली खूप गर्दी

कुणी दिले चाटन
कुणी दिले औषध कडू
बिचाऱ्या उंदीरमामाला
फुटले मग रडू

विविध घेतली औषधे
तरी वाटेना बरे
उंदीरमामा गेला त्रासून
उपाय संपले सारे

शेवटी एका मित्राचा
उपाय आला कामी
सुंठमिऱ्याचा काढा देवून
युक्ती शोधली नामी

काही वेळातच उंदीरमामाचा
आजार दूर पळाला
आनंदाच्या भरात म्हणे
चला सर्व खेळायला




**- रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106


## सर्वांनी जाणून घ्यावे

विचार महामानवांचे,
सर्वांनी जाणून घ्यावे.
अमलात आणतांना,
एकमेकांची साथ द्यावे. १

महामानवांचे विचार,
सदा सर्वांनी पाळावे.
अंधश्रद्धेला कायम,
सदविचारांनी जाळावे. २

महामानवांचे विचार,
जगतांना बळ देतात.
संकटकाळात सदैव,
काळजी कायम घेतात. ३

महामानवांचे विचार,
हित जगाचे करतात.
जगतांना जीवनात,
सदा सप्तरंग भरतात. ४

महामानवांचे विचार,
सत्याला देतात आधार.
प्रयत्न करता करता,
स्वप्न होतात साकार. ५

महामानवांचे विचार,
सर्वांनी कोळून प्यावे.
विचार पेरता पेरता,
जगाची काळजी घ्यावे. ६

महामानवांचे विचार,
घडवून आणतात क्रांती.
महामानवांच्या विचारांनी,
प्रस्थापित करतात शांती. ७




**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


## उष्माघातापासून बचावासाठी जिल्हा प्रशासनाचे आवाहन : मार्गदर्शक सूचना जारी

**बीड (भगवंत पाळवदे) :** प्रादेशिक हवामान केंद्र, कुलाबा ,मुंबई यांनी दिनांक १६ एप्रिल ते १८ एप्रिल२०२६ या कालावधीत येलो अलर्ट (yellow Alert) जारी केला आहे . कालावधीमध्ये तुरळ ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता वर्तवली आहे. उन्हाळ्यात तापमानात होणारी वाढ लक्षात घेता जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने उष्माघातापासून बचावासाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.सुरक्षेचे उपाययोजना तहान लागलेली नसली तरीही दर अर्ध्या तासाने पुरेसे पाणी प्यावे. शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवून ठेवण्यासाठी ओआरएस (ORS), लस्सी, लिंबू पाणी, ताक आणि कैरीचे पन्हे यांसारख्या घरगुती पेयांचा वापर करावा. बाहेर पडताना हलके, पातळ आणि सच्छिद्र सुती कपडे वापरावेत. डोके झाकण्यासाठी छत्री, टोपी किंवा ओल्या कापडाचा वापर करावा. दुपारी १२ ते ३ या वेळेत शक्यतो घराबाहेर जाणे टाळावे. कष्टाची कामे पहाटेच्या वेळी उरकून घ्यावीत आणि कामाच्या ठिकाणी मध्ये-मध्ये विश्रांती घ्यावी.घर थंड ठेवण्यासाठी पडदे आणि सनशेडचा वापर करावा. रात्रीच्या वेळी खिडक्या उघड्या ठेवाव्यात. पाळीव प्राणी आणि गुरांना छावणीत ठेवावे व त्यांना पिण्यासाठी पुरेसे पाणी द्यावे.चक्कर येणे, सतत घाम येणे, डोकेदुखी किंवा अशक्तपणा जाणवल्यास ही उष्माघाताची लक्षणे असू शकतात. अशा वेळी तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. सावधगिरीच्या सूचना चहा, कॉफी, दारू आणि कार्बोनेटेड थंड पेये घेणे टाळावे, कारण यामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊ शकते. उच्च प्रथिनयुक्त आणि शिळे अन्न खाऊ नका. लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या पार्क केलेल्या वाहनात सोडू नका. तापमान जास्त असताना कष्टाची कामे टाळावीत. उन्हाच्या तीव्र कालावधीत स्वयंपाक करणे टाळावे आणि स्वयंपाकघरात हवेशीर वातावरण ठेवावे.

जिल्हा प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अधिक माहितीसाठी राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या सोशल मीडिया हँडलला (@SDMAMaharashtra) भेट द्यावी किंवा जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावरील सूचनांचे पालन करावे. स्वतःचा आणि आपल्या कुटुंबाचा उष्माघातापासून बचाव करण्यासाठी प्रशासनाने दिलेल्या या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## तोफखाना केंद्रीय विद्यालयाचा १० विद्यार्थ्यांना ९० टक्के पेक्षा अधिक गुण



**प्रतिक्षा आहेर**
**९४.१७%**



**सृष्टी अहिरे**
**९३.६७%**



**रिद्धी सातपुते**
**९२.८३%**

**नाशिक रोड (प्रतिनिधी) :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ सीबीएसई तर्फे मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीचा निकाल जाहीर झाला आहे. तोफखाना केंद्र परिसरातील पीएम श्री केंद्रीय विद्यालय नाशिक रोड कॅम्प चा दहावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही दहावीच्या निकालात मुलींनी बाजी मारली आहे. शाळेतील ३ विद्यार्थ्यांना एआय विषयात पूर्ण १०० गुण मिळाले आहेत. शाळेने निकालाची परंपरा राखली असून विद्यार्थ्यांनी गुणवत्ता सिद्ध केली असल्याची माहिती प्राचार्य गजराज मीना यांनी दिली. शाळेतून एकूण १४७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. प्रतिक्षा आहेर हिने ९४.१७ टक्के गुण घेवून प्रथम स्थान प्राप्त केले तर सृष्टी अहिरे हिने ९३.६७ टक्के आणि रिद्धी सातपुते हिने ९२.८३ टक्के गुण घेवून अनुक्रमे द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त केले आहे. उज्ज्वला चांदोरकर यांच्या मार्गदर्शनात शैक्षणिक प्रशासनाचे शिस्तबद्ध नियोजन, कृष्णा आव्हाड, अश्विनी टोंगळे, निमिषा सिंह, शैलेंद्र यादव, तुषार वारडे, प्रल्हाद संगनाळे, आदी सह सर्व शिक्षकांचे नियोजनबद्ध अध्यापन आणि विद्यार्थ्यांच्या सुव्यवस्थित अभ्यासाचा परिपाक म्हणजे हे यश असून सर्व शिक्षक व पालकांकडून विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
**साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स**
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274 ,8956362639 , 9270446603 , 9405109103
**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com



**प्रतिनिधी नेमणे आहे**
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १७ एप्रिल २०२६


## महाराष्ट्रातील उच्च उष्णतेच्या जोखमीच्या शहरी जिल्ह्यांतील बाह्य (मैदानी) असंघटित कामगारांच्या संरक्षणाबाबत मार्गदर्शक सूचना

**बीड (भगवंत पाळवदे) :** उच्चउष्णतेच्या लाटा संभावित असणाऱ्या शहरी जिल्ह्यातील मैदानी असंघटीत कामगारांच्या संरक्षणाबाबत राज्य शासनाने मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.१. उद्दिष्ट-उष्णतेच्या लाटांच्या काळात शहरी भागातील बाहेर काम करणाऱ्या असंघटित कामगारांचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र-विशिष्ट आणि अंमलात आणता येईल असा आराखडा उपलब्ध करून देणे. ही मानक कार्यपद्धती (एसओपी) एनडीएमए यांनी जारी केलेल्या राष्ट्रीय मार्गदर्शक सूचनांवर, महाराष्ट्र राज्य उष्णता कृती आराखड्यावर स्टेट ॲक्शन प्लॅन ऑन क्लायमेट चेंज अँड ह्यूमन हेल्थ वर आधारित आहे.२. कार्यक्षेत्र-महाराष्ट्र हा भारतातील उष्णतेस अत्यंत संवेदनशील असलेल्या शीर्ष १० राज्यां/केंद्रशासित प्रदेशांपैकी एक आहे. राज्य उष्णता कृती आराखड्यानुसार विदर्भ, मराठवाडा आणि खानदेश या भागांतील खालील १५ जिल्हे अत्यंत उष्णतेच्या जोखमीचे म्हणून ओळखले गेले आहेत:लातूर, अमरावती, यवतमाळ, वाशीम, अकोला, बुलढाणा, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, जळगाव, नंदुरबार, धुळे आणि नांदेड.ही मार्गदर्शक सूचना वरील उच्च-जोखमीच्या जिल्ह्यांतील शहरी भागांसाठी लागू आहे, विशेषतः अंतर्गत आणि अर्ध-कोरड्या प्रदेशांसाठी. तसेच, उष्णतेचा तीव्र ताण अनुभवणाऱ्या इतर किनारपट्टीबाहेरील शहरी भागांनीही ही एसओपी अवलंबू शकतात. ही एसओपी महाराष्ट्रातील उच्च-उष्णता-जोखीम असलेल्या शहरी भागांमध्ये कार्यरत सर्व महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींना लागू आहे.ही मार्गदर्शक सूचना मुख्यतः खालील उष्णतेला तोंड देणाऱ्या बाह्य (मैदानी) असंघटित कामगारांवर केंद्रित आहे:फेरीवाले, बांधकाम व दैनंदिन मजूर, वाहतूक पोलीस, स्वच्छता कर्मचारी, गिग आणि डिलिव्हरी कामगार, रिक्षा चालक/ओढणारे, हमाल३. मार्गदर्शक उपाय सुरू करण्याच्या अटी-भारतीय हवामान विभागाच्या (आयएमडी) उष्णतेच्या लाटेसंबंधी मार्गदर्शक सूचना आणि परिणाम-आधारित रंग-कोडित उष्णता इशाऱ्यांनुसार खालील अटी पूर्ण झाल्यास ही मार्गदर्शक सूचना सक्रिय करण्यात येईल:ट्रिगर अटी-आयएमडी इशारा स्तरपिवळा – उष्णतेचा इशाराउष्णतेची लाट सलग २ दिवसांपर्यंत टिकते सल्ल्याची लवकर सक्रियता; तयारीची उपाययोजना व जनजागृती*केशरी – तीव्र उष्णतेचा इशारा उष्णतेची लाट सलग ≥ ४ दिवस टिकते किंवा तीव्र उष्णता सलग २ दिवस आढळतेसल्ल्याची पूर्ण सक्रियता; सर्व शहरी स्थानिक संस्था, परिषद व पंचायत स्तरावर कामगार संरक्षण उपायांची अंमलबजावणीला – अतितीव्र उष्णतेचा इशारातीव्र उष्णता सलग २ दिवसांपेक्षा जास्त टिकते किंवा एकत्रित परिणामआपत्कालीन स्तरावर सल्ल्याची अंमलबजावणी; अनावश्यक बाहेरील कामांवर निर्बंध· कामाच्या ठिकाणी महिलांची सुरक्षितता- कामाच्या ठिकाणी महिलांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी योग्य प्रकाशयोजना, सुरक्षित वाहतूक सुविधा आणि संरक्षणात्मक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.प्रमुख विभाग: जिल्हा कामगार विभागसहभागी संस्था: महानगरपालिका, पोलीस, कंत्राटदार, प्लॅटफॉर्म कंपन्या.4.1 पाणीपुरवठा-· प्रमुख अनौपचारिक कामाच्या ठिकाणी जसे बाजारपेठ, चौक, ट्रॅफिक सिग्नल, वाहतूक केंद्रे आणि विक्री क्षेत्र येथे पिण्याच्या पाण्याचे बूथ उभारावेत. स्पष्ट सूचना फलक लावून नियमित पाणी भरण्याची व्यवस्था करावी.· प्राथमिक आरोग्य केंद्रे, वॉर्ड कार्यालये आणि स्वयंसेवी संस्थांमार्फत ओआरएस व इलेक्ट्रोलाइट पावडरचे वितरण करावे.· नियोक्त्यांच्या सूचनांद्वारे आणि सहकाऱ्यांच्या जनजागृतीद्वारे नियमित पाणी पिण्याचे ब्रेक घेण्यास प्रोत्साहन द्यावे.प्रमुख विभाग: जिल्हाधिकारी कार्यालय, महानगरपालिका सहभागी संस्था: आरोग्य विभाग, वॉर्ड कार्यालये, कामगार संघटना, स्वयंसेवी संस्था4.2 थंडावा केंद्रे, सावली व्यवस्था आणि संरक्षणात्मक साहित्य· उद्याने आणि बागा दुपारच्या वेळेतही खुली व सुलभ ठेवावीत. नाके, विक्री क्षेत्रे, कामगार चौक आणि ट्रॅफिक सिग्नल येथे तात्पुरत्या सावलीची व्यवस्था करावी.· सार्वजनिक इमारतींना तात्पुरत्या 'कूलिंग शेल्टर'मध्ये रूपांतरित करून त्यामध्ये पंखे, पिण्याचे पाणी आणि चटया उपलब्ध कराव्यात. उष्णतेपासून संरक्षणासाठी किटचे वितरण करावे (ओआरएस, पाण्याच्या बाटल्या, टोपी, कूलिंग टॉवेल, कापडी स्कार्फ). विश्रांती क्षेत्रात कमी खर्चिक थंडावा उपाय (मिस्ट फॅन, कूलर) उपलब्ध करावेत.प्रमुख विभाग: जिल्हाधिकारी कार्यालय, महानगरपालिकासहभागी संस्था: जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, स्वयंसेवी संस्था, स्थानिक लोकप्रतिनिधी.4.3 वैद्यकीय तयारी आणि देखरेख-· प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि शहरी आरोग्य केंद्रे येथे ओआरएस, आयव्ही फ्लुइड्स आणि उष्णताजन्य आजारांच्या उपचारासाठी आवश्यक किट उपलब्ध ठेवाव्यात.· आशा, एएनएम आणि वॉर्ड आरोग्य कर्मचाऱ्यांना उष्णताजन्य आजार ओळखणे आणि प्राथमिक उपचार याबाबत प्रशिक्षण द्यावे.· उच्च जोखीम क्षेत्रात 108 रुग्णवाहिका पूर्वनियोजित ठेवून प्रतिसाद वेळेवर लक्ष ठेवावे. तीव्र उष्णतेच्या काळात त्वरित वैद्यकीय सेवा आणि उपचार सुनिश्चित करावेत.· एसओपी व हीट ॲक्शन प्लॅन पुनरावलोकन1. आरोग्य केंद्रांमधील डेटा आणि कामगारांच्या अभिप्रायाच्या आधारे एसओपी व हीट ॲक्शन प्लॅन मध्ये आवश्यक सुधारणा कराव्यात.2. अनौपचारिक क्षेत्रातील कामगारांचे प्रतिनिधित्व पुनरावलोकन प्रक्रियेत आणि भविष्यातील नियोजनात सुनिश्चित करून समावेशकता आणि प्रतिसादक्षमता वाढवावी.प्रमुख विभाग: जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणसहभागी संस्था: जिल्हा आरोग्य कार्यालय, कामगार विभाग, महानगरपालिका, स्वयंसेवी संस्था, कामगार संघटना4.4

उष्णता-प्रतिरोधक पायाभूत सुविधा व शहरी नियोजन· शहरी नियोजनात सावलीयुक्त सार्वजनिक जागा, वृक्षारोपण, परावर्तित पृष्ठभाग आणि मिस्टिंग सिस्टिम्सचा समावेश करावा.· गर्दीच्या कामाच्या ठिकाणी कायमस्वरूपी सावली, कूल रूफ (थंड छप्पर) आणि पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करावी.· नियोक्ते आणि बाजार समित्यांना थंडावा देणाऱ्या पायाभूत सुविधा उभारण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.प्रमुख विभाग: जिल्हा शहरी विकास विभाग, विकास प्राधिकरणे


## जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-

२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-

३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-

४. शुभेच्छा जाहिरात ६००/-


## "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालयात अभिवादन"




**छत्रपती संभाजीनगर :** विश्वरत्न कायदेपंडित ज्ञानाच प्रतीक भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आज भारतरत्न राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालयात जयंती साजरी करण्यात आली. महामानव डॉ. भिमराव रामजी आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळेस सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी गावातील नागरिक श्री. सुंदरराव देवकर, युवा नेते आकाश गायकवाड व प्राचार्य प्रा.संतोष पंडगे उपस्थितीत होते.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये ६१ बालविवाह रोखले



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यात जिल्हा महिला व बालविकास विभागाने गेल्या वर्षभरात ६१ बालविवाह रोखले आहेत. कायद्यानुसार, मुलीचे वय १८ वर्षांपेक्षा कमी आणि मुलाचे वय २१ वर्षांपेक्षा कमी असल्यास तो विवाह बालविवाह ठरतो आणि तो करण्यास सक्त मनाई आहे.

बालविवाह केवळ कायद्यानेच नव्हे, तर सामाजिक, शैक्षणिक, बालमानसशास्त्र आणि आरोग्याच्या दृष्टीनेही हानिकारक मानले जातात. हे विवाह मंगल कार्य नसून, मुलामुलींच्या भविष्यावर नकारात्मक परिणाम करतात. त्यामुळे असे विवाह रोखणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

बालविवाह रोखण्यासाठी जिल्हा महिला व बालविकास विभागाकडून विविध उपाययोजना केल्या जातात. जागरूक नागरिकांचा सहभाग आणि यंत्रणेचा तात्काळ प्रतिसाद यामुळे हे बालविवाह रोखणे शक्य झाले. बालविवाह प्रतिबंध ही एक चळवळ होण्यासाठी सर्वसामान्यांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी महेंद्र दराडे यांनी केले आहे.

जिल्हा महिला व बालविकास कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत एकूण ६१ बालविवाह रोखण्यात आले. यामध्ये छत्रपती संभाजीनगरमध्ये २५, पैठणमध्ये ८, गंगापूरमध्ये ८, वैजापूरमध्ये ३, कन्नडमध्ये २, खुलताबादमध्ये २, फुलंब्रीमध्ये ४, सोयगावमध्ये २ आणि सिल्लोडमध्ये ७ बालविवाह रोखले गेले.

रोखलेल्या ६१ प्रकरणांपैकी ५ ठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आले, तर २ पीडित बालिकांना बालगृहांमध्ये संरक्षण पुरवण्यात आले. इतर प्रकरणांमध्ये बालविवाह रोखून पालकांकडून लेखी हमीपत्र घेण्यात आले.

नागरिकही बालविवाह निर्मूलनात योगदान देऊ शकतात. आपल्या परिचयात कुठेही बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यास तात्काळ नजीकचे पोलीस ठाणे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयांतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्ष किंवा चाइल्ड हेल्पलाईन १०९८ क्रमांकावर संपर्क साधावा. माहिती देणाऱ्या नागरिकाचे नाव गोपनीय ठेवले जाते.

समाजातील सजग नागरिकांनी चाइल्ड हेल्पलाईन १०९८ वर बालविवाहाची माहिती दिल्यास, ती तक्रार संबंधित जिल्ह्यातील चाइल्ड हेल्पलाईनला जोडली जाते. ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. या हेल्पलाईनवरून समन्वय साधून जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, संबंधित क्षेत्राचे पोलीस अधिकारी, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक, पोलीस पाटील, सरपंच आणि बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या समन्वयातून एक पथक तयार केले जाते. हे पथक घटनास्थळी भेट देऊन पोलिसांच्या मदतीने बालविवाहास प्रतिबंध करते. आवश्यकता भासल्यास पीडित बालिकेस आश्रय दिला जातो आणि तिचे व तिच्या पालकांचे समुपदेशन केले जाते. बालिकेचे पुनर्वसन करण्याचीही उपाययोजना केली जाते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १७ एप्रिल २०२६


## डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणा पुरस्कार व ग्लोबल स्टार टीचर अवॉर्ड साठी विठ्ठल अनमुलवाड यांची निवड



**पूर्णा (जि. परभणी) :** अभिनव विद्या विहार प्राथमिक शाळा, पूर्णा येथील शिक्षक विठ्ठल जयवंतराव अनमुलवाड यांनी आपल्या मेहनती, नाविन्यपूर्ण आणि विद्यार्थीकेंद्रित कामामुळे शिक्षण क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणा पुरस्कार 2026 आणि ग्लोबल स्टार टीचर अवॉर्ड 2026 या दोन प्रतिष्ठित पुरस्कारांसाठी निवड झाली आहे.अनमुलवाड यांनी “भविष्यवेधी शिक्षण” या संकल्पनेवर काम करत पारंपरिक अध्यापनात आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश केला आहे. ते YouTubeच्या माध्यमातून शैक्षणिक व्हिडिओ तयार करून विद्यार्थ्यांना सोप्या पद्धतीने अभ्यास समजावून सांगतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यासावरील रस वाढला आहे.“सेल्फी विथ सक्सेस” या उपक्रमातून त्यांनी 200 पेक्षा जास्त शैक्षणिक आव्हाने पूर्ण केली आहेत. तसेच “जो दिनांक तो पाढा”, “पुस्तक वाचन”, “We Learn English”, “We Learn Japanese” यांसारखे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणला आहे.त्यांच्या मार्गदर्शनाखाली काही विद्यार्थ्यांनी कथा, कादंबरी, महापुरुषांची 50 च्या वर पुस्तके वाचली असून वाचनाची चांगली सवय लावली आहे. हस्ताक्षर स्पर्धा आणि शिष्यवृत्ती परीक्षांसाठी घेतलेल्या अतिरिक्त तासिकांमुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारली आहे.अनमुलवाड हे “अक्षर आनंद वाचन संस्कार केंद्र” आणि ‘ई-बालमासिक’मध्ये उपसंपादक म्हणूनही कार्य करत आहेत. त्यांनी “Edu तंत्र” या राज्यस्तरीय मासिकात तसेच विविध वृत्तपत्रांत लेख लिहिले आहेत. “संपूर्ण मराठी शब्दसराव लेखन पुस्तिका” आणि “Complete English Word Writing Practice Booklet” ही त्यांची पुस्तके विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरत आहेत.यापूर्वीही त्यांच्या कार्याचा सन्मान अनेक पुरस्कारांनी करण्यात आला आहे. महाराष्ट्र शिक्षक पॅनलचा राज्यस्तरीय सेवासन्मान पुरस्कार, ध्येय एज्युकेशन फाउंडेशन महाराष्ट्रचा आदर्श शिक्षक पुरस्कार, आमदार रत्नदीप आदर्श शिक्षक पुरस्कार, माणुसकी मल्टीपर्पज फाउंडेशन, मलकापूरचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार तसेच समर्थ कार्यगौरव पुरस्कार त्यांनी मिळवले आहेत.त्यांच्या या यशाबद्दल शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष मा. आनंदजी अजमेरा, माजी मुख्याध्यापक मा. हिराजी भोसले, संचालक मा. दिलीप माने, मुख्याध्यापक मा. सत्यनारायण रणवीर, मुख्याध्यापिका सौ. निर्मला रेड्डी, पर्यवेक्षक मा. रमेश सूर्यवंशी तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students

Government Recognised

Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT

X-RAY | C.T.-SCAN

E.C.G. | Radiology


Physiotherapy | Optometry

O. T. TECHNICIAN

PG Radiology

Contact: 9405109103 8830838903


## "स्त्रियांना फक्त गृहिणी म्हणून पाहण्याचे दिवस गेले; आता त्यांना राष्ट्रनिर्माते म्हणून पाहण्याची गरज आहे." : पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी




**भा**रतातील एखाद्या गावातील तिशीतली स्त्री डोळ्यासमोर आणा. काही वर्षांपूर्वी ती पहाटे अंधारात, भीतीच्या छायेत घराबाहेर जाऊन नैसर्गिक विधी आटोपत असे. घरातील सर्वांसाठी पाणी दूरवरून आणणे, लाकडाच्या धुरात स्वयंपाक करणे, स्वतःच्या नावावर घर नसणे, बँक खाते नसणे—अशा अनेक मर्यादांमध्ये तिचे आयुष्य अडकलेले होते. पण आज ही परिस्थिती बदलली आहे. या परिवर्तनाला नाव आहे—“नारी शक्ती”. गेल्या काही वर्षांत महिलांच्या जीवनातील प्रत्येक पैलू एकमेकांशी जोडून बदल घडविण्याचा प्रयत्न झाला आहे.सन्मानाला प्राधान्य :महिलांच्या सन्मानाची सुरुवात मूलभूत गरजांपासून झाली. स्वच्छ भारत अभियानातून कोट्यवधी शौचालयांची निर्मिती झाली आणि ग्रामीण भारत खुले शौचालयमुक्त झाला. यामुळे महिलांची सुरक्षितता वाढली. जल जीवन मिशनमुळे घराघरात नळजोडणी झाली आणि पाण्यासाठी होणारी दररोजची कसरत कमी झाली. उज्ज्वला योजनेतून महिलांच्या नावावर गॅस कनेक्शन मिळाले, धुरामुळे होणारे आरोग्याचे त्रास कमी झाले. प्रधानमंत्री आवास योजनेत महिलांच्या नावावर घरे देण्यात आली, ज्यामुळे त्यांना मालकी हक्क आणि आर्थिक सुरक्षितता मिळाली. शौचालय, पाणी, इंधन आणि घर, हे केवळ योजना नसून सन्मान पुनर्स्थापित करण्याचा एकत्रित प्रयत्न आहे.जन्मापासून आरोग्याची हमी :महिलांच्या सक्षमीकरणाची सुरुवात जन्मापूर्वीपासूनच होते. पोषण अभियान (POSHAN 2.0) बालकांच्या पहिल्या 1000 दिवसांवर लक्ष केंद्रित करते. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेतून मातांना थेट आर्थिक मदत मिळते. सुरक्षित मातृत्व आश्वासन ‘सुमन’ योजना राबविण्यात आली आहे. तसेच प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि जीवन ज्योती विमा योजना यामुळे महिलांना आर्थिक संरक्षण मिळाले. ‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’मुळे मुलींच्या जन्मदरात सुधारणा झाली, तर ‘सुकन्या समृद्धी’ योजनेमुळे मुलींचे भविष्य सुरक्षित झाले.जगण्यापासून स्वप्नांकडे :आर्थिक स्वावलंबन हा सक्षमीकरणाचा कणा आहे. जनधन योजनेमुळे कोट्यवधी महिलांना बँकिंग व्यवस्थेशी जोडले गेले. मुद्रा योजनेत महिलांना मोठ्या प्रमाणावर कर्ज मिळाले. स्वयं-सहायता गटांच्या माध्यमातून महिलांनी उद्योग, व्यवसाय सुरू केले. ‘लखपती दीदी’ ही संकल्पना ग्रामीण महिलांसाठी प्रेरणादायी ठरली आहे. ‘नमो ड्रोन दीदी’सारख्या उपक्रमातून महिलांना आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जात आहे.सुरक्षा आणि न्याय :महिलांच्या सुरक्षिततेसाठी ‘मिशन शक्ती’ अंतर्गत सखी वन-स्टॉप केंद्रे सुरू करण्यात आली आहेत, जिथे कायदेशीर, वैद्यकीय आणि समुपदेशन सेवा एकाच ठिकाणी मिळतात. महिला हेल्पलाईन, निर्भया निधी आणि इतर उपक्रमांनी सुरक्षा यंत्रणा अधिक मजबूत केली आहे. तात्काळ तीन तलाक बंदी हा महिलांच्या अधिकारांसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरला.महिलांचा अवकाशआज भारतीय महिला प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होत आहेत. अवकाश संशोधनापासून संरक्षण क्षेत्रापर्यंत त्यांनी आपली छाप पाडली आहे. महिला आता केवळ सहभागी नाहीत, तर नेतृत्वही करत आहेत. STEM क्षेत्रातही महिलांची संख्या वाढत आहे.संवैधानिक टप्पा :‘नारी शक्ती वंदन अधिनियम’ हा महिलांच्या राजकीय सक्षमीकरणाचा ऐतिहासिक निर्णय आहे. लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांना 33% आरक्षण देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पंचायती राज व्यवस्थेतही जवळपास अर्ध्या प्रतिनिधी महिला आहेत. महिलांचे नेतृत्व वाढल्यास समाजातील विकास अधिक सर्वसमावेशक होतो, हे सिद्ध झाले आहे.360 अंशांचा दृष्टिकोन :शौचालय, पाणी, इंधन, घर, आरोग्य, रोजगार, सुरक्षा आणि प्रतिनिधित्व—हे सर्व घटक एकमेकांशी जोडलेले आहेत. यापैकी एक जरी तुटला, तरी सक्षमीकरणाची साखळी अपूर्ण राहते. म्हणूनच हा 360 अंशांचा दृष्टिकोन आहे—महिलांच्या संपूर्ण जीवनाचा विचार करणारा.

आज भारत ‘कल्याणकारी’ दृष्टीकोनातून ‘महिला-नेतृत्वाखालील विकास’ या दिशेने वाटचाल करत आहे. या प्रवासात प्रत्येक महिलेला सोबत घेणे हीच खरी प्रगती ठरेल."नारी शक्ती पुढे चालली आहे; आता देशाने कोणतीही महिला मागे राहू देऊ नये.“


**आर. विमला (भा. प्र. से.)**
सचिव तथा निवासी आयुक्त,
महाराष्ट्र सदन


## आदित्य ठाकरेंनी हिरोईनला मारले : लोकसभेत निशिकांत दुबेंचा आरोप

**मुंबई :** संसदेच्या विशेष अधिवेशनात महिला आरक्षण विधेयकावर (नारी शक्ती वंदन विधेयक) चर्चा सुरू असताना आज सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये वैयक्तिक आरोपांची मोठी चकमक उडाली. भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी थेट आदित्य ठाकरे यांचे नाव घेत गंभीर आरोप केल्याने शिवसेना (ठाकरे गट) खासदार अरविंद सावंत आणि राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे प्रचंड संतापले. "मी तोंड उघडले तर गोध्रा आणि तडीपारीचे किस्सेही बाहेर येतील," अशा शब्दांत सावंतांनी भाजपला आरसा दाखवला.

केंद्र सरकार नारी शक्ती वंदन विधेयक आणण्याच्या तयारीत आहे. हे विधेयक पारित करण्यासाठी संसदेचे तीन दिवसीय विशेष अधिवेशन देखील बोलावण्यात आले आहे. विशेष अधिवेशनाच्या सुरुवातीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या विधेयकामागील सरकारची भूमिका स्पष्ट केली. "हे विधेयक महिलांच्या सक्षमीकरणासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे आणि आम्हाला याचे कोणतेही श्रेय घ्यायचे नाही," असे मोदींनी यावेळी नमूद केले. मात्र, त्यानंतर सुरू झालेल्या चर्चेत राजकीय आरोपांच्या फैरी झाडल्या गेल्या.

विधेयकावरील चर्चेत सहभागी होताना अरविंद सावंत यांनी भाजपला महिला सुरक्षेच्या मुद्द्यावरून धारेवर धरले. ते म्हणाले, "महाराष्ट्रात महिलांवर अत्याचार होत आहे. आमच्या महाराष्ट्राला कलंकीत केले जात आहे. हे बिल आणले तेव्हा मनात एकच गोष्ट येतो की, हे विधेयक आताच का मंजूर करायचे आहे? जून-जुलै महिन्यात मंजूर केले जाऊ शकत नव्हते?

निवडणुकीच्या वेळी का? कारण तुम्हाला माहिती होतं की, निवडणुकीच्या काळात अनेक विरोधी पक्षाचे खासदार हजर राहू शकणार नाहीत. गैरहजर राहिले तर आपल्याला बिल पास करायला सोपे होईल", असा टोला अरविंद सावंत यांनी लगावला.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १७ एप्रिल २०२६

# वारसा म्हणजे संस्कृतीचा श्वास

दरवर्षी 18 एप्रिल हा दिवस ‘जागतिक वारसा दिन’ म्हणून साजरा केला जातो आणि या दिवसाचे महत्त्व केवळ औपचारिक स्मरणापुरते मर्यादित न राहता, मानवी सभ्यतेच्या उत्क्रांतीतील सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि नैसर्गिक संपदेचे महत्त्व अधोरेखित करणारा एक चिंतनाचा दिवस म्हणून पाहणे आवश्यक ठरते. मानवी समाजाने हजारो वर्षांच्या कालखंडात निर्माण केलेल्या परंपरा, मूल्ये, स्थापत्यकला, कला, ज्ञानप्रणाली आणि सामाजिक संस्था यांचा एकत्रित संच म्हणजे वारसा होय. हा वारसा केवळ भूतकाळाचा अवशेष नसून वर्तमानातील ओळखीचा पाया आणि भविष्याच्या विकासाचा मार्गदर्शक आहे. त्यामुळे जागतिक वारसा दिन हा आपल्याला आपल्या मुळांशी पुन्हा जोडणारा, आपली ओळख दृढ करणारा आणि जतनाची जबाबदारी जाणवून देणारा एक अत्यंत महत्त्वपूर्ण दिवस आहे.वारसा या संकल्पनेचा व्यापक विचार केला असता, त्यात भौतिक आणि अमूर्त अशा दोन्ही घटकांचा समावेश होतो. भौतिक वारशामध्ये किल्ले, मंदिरे, विहारे, स्मारके, गुहा, ऐतिहासिक वास्तू, पुरातत्त्वीय स्थळे, लेण्या आणि निसर्गसंपन्न क्षेत्रांचा समावेश होतो. या स्थळांमध्ये त्या त्या काळातील स्थापत्यकौशल्य, तांत्रिक प्रगती आणि सांस्कृतिक दृष्टिकोन प्रतिबिंबित होतो. दुसरीकडे अमूर्त वारशामध्ये भाषा, लोकपरंपरा, सण-उत्सव, लोककला, संगीत, नृत्य, जीवनशैली आणि श्रद्धा यांचा समावेश होतो. हे अमूर्त घटक समाजाच्या सांस्कृतिक जडणघडणीचे प्रतीक असतात आणि ते समाजाच्या मानसिकतेचे, विचारसरणीचे आणि जीवनमूल्यांचे दर्शन घडवतात. या दोन्ही प्रकारचा वारसा एकमेकांशी परस्परपूरक असून समाजाच्या ओळखीचा पाया तयार करतात.भारतीय वारशाचा विचार केला तर त्याची व्याप्ती आणि वैविध्य हे जगातील इतर कोणत्याही देशाच्या तुलनेत अधिक समृद्ध आहे. प्राचीन सिंधू संस्कृतीपासून सुरू झालेला हा प्रवास वैदिक, बौद्ध, जैन, मौर्य, गुप्त, चालुक्य, मुघल आणि मराठा अशा विविध कालखंडांतून पुढे सरकत आधुनिक भारतापर्यंत पोहोचतो. प्रत्येक कालखंडाने आपल्या संस्कृतीचे, कलेचे आणि विचारांचे वेगळे योगदान दिले आहे. भारतातील विविध धर्म, भाषा, जाती आणि परंपरा यांनी मिळून एक बहुरंगी सांस्कृतिक पट तयार केला आहे. त्यामुळे भारतातील वारसा स्थळे ही केवळ पर्यटनाची साधने नसून ती इतिहासाची साक्ष देणारी जिवंत कागदपत्रे आहेत.महाराष्ट्राच्या संदर्भात पाहिले तर येथील वारसा हा अत्यंत प्रेरणादायी आहे. सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये उभे असलेले किल्ले हे स्वराज्याच्या संघर्षाचे आणि शौर्याचे प्रतीक आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले हे किल्ले आजही आत्मविश्वास आणि स्वाभिमानाची प्रेरणा देतात. अजिंठा-वेरूळ लेण्यांतील शिल्पकला आणि भित्तिचित्रे प्राचीन भारतीय कलेचे उत्कृष्ट उदाहरण आहेत. त्याचप्रमाणे वारकरी संप्रदाय, भजन-कीर्तन, लोकनृत्य आणि सण-उत्सव हे महाराष्ट्राच्या अमूर्त वारशाचे महत्त्वाचे घटक आहेत. या सर्व गोष्टी समाजाच्या सांस्कृतिक ओळखीला आकार देतात आणि सामाजिक एकात्मता वाढवतात.आजच्या आधुनिक युगात वारसा जतन करणे ही एक मोठी आव्हानात्मक जबाबदारी बनली आहे. शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि वाढते पर्यटन यामुळे अनेक वारसा स्थळांवर ताण निर्माण झाला आहे. अतिक्रमण, प्रदूषण, दुर्लक्ष आणि अनियंत्रित विकास यामुळे अनेक ऐतिहासिक स्थळांचे नुकसान होत आहे. काही ठिकाणी तर वारसा स्थळांचे मूळ स्वरूपच नष्ट होत आहे. यामागे केवळ शासनाची कमतरता नसून समाजातील जागरूकतेचा अभावही कारणीभूत आहे. अनेकदा लोक वारसा स्थळांकडे केवळ मनोरंजनाच्या दृष्टीने पाहतात आणि त्याच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्वाकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे वारसा जतनासाठी समाजातील प्रत्येक घटकाने सजग होणे आवश्यक आहे.वारसा संवर्धनासाठी शिक्षण हे अत्यंत प्रभावी साधन आहे. विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच आपल्या वारशाचे महत्त्व पटवून दिल्यास त्यांच्या मनात जतनाची भावना निर्माण होते. इतिहासाचा अभ्यास केवळ पाठांतरापुरता मर्यादित न ठेवता, त्यामागील सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ समजावून सांगणे आवश्यक आहे. शैक्षणिक सहलींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वारसा स्थळांचा प्रत्यक्ष अनुभव दिल्यास त्यांचे ज्ञान अधिक समृद्ध होते आणि त्यांच्या मनात वारशाबद्दल आदर निर्माण होतो. शिक्षणाच्या माध्यमातून निर्माण झालेली ही जाणीव भविष्यात वारसा संवर्धनासाठी उपयुक्त ठरते.तंत्रज्ञानाच्या युगात वारसा जतनासाठी नवीन साधने उपलब्ध झाली आहेत. डिजिटल दस्तऐवजीकरण, आभासी पर्यटन, त्रिमितीय प्रतिकृती आणि डिजिटल संग्रहालयांच्या माध्यमातून वारशाचे जतन अधिक प्रभावीपणे करता येते. यामुळे जगभरातील लोकांना विविध वारसा स्थळांची माहिती सहजपणे उपलब्ध होते. तसेच आपत्तीच्या काळात या डिजिटल नोंदींचा उपयोग वारसा पुनर्स्थापनासाठी होऊ शकतो. त्यामुळे तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून वारसा जतनाची प्रक्रिया अधिक सक्षम करता येते.पर्यटन आणि वारसा यांचा संबंध अत्यंत निकटचा आहे. वारसा स्थळांमुळे पर्यटनाला चालना मिळते आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळते. परंतु अनियंत्रित पर्यटनामुळे वारसा स्थळांचे नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे शाश्वत पर्यटनाची संकल्पना स्वीकारणे आवश्यक आहे. पर्यटकांनी जबाबदारीने वागून वारसा स्थळांचे संरक्षण करणे गरजेचे आहे. स्थानिक समुदायांचा सहभाग वाढवून पर्यटन व्यवस्थापन अधिक प्रभावी करता येते.वारसा जतन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे. आपल्या दैनंदिन जीवनातही आपण वारसा जतनासाठी योगदान देऊ शकतो. घरातील परंपरा जपणे, स्थानिक कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देणे, वारसा स्थळांवर स्वच्छता राखणे आणि त्यांचे संरक्षण करणे या छोट्या कृतीतून मोठा बदल घडवून आणता येतो. समाजातील प्रत्येक घटकाने या कार्यात सहभागी झाल्यास वारसा जतनाची प्रक्रिया अधिक प्रभावी होईल.जागतिक वारसा दिनाच्या निमित्ताने आपण आपल्या वारशाचे पुनर्मूल्यांकन करण्याची गरज आहे. आपण कोण आहोत, आपल्या समाजाची ओळख काय आहे आणि भविष्यात आपण कोणत्या दिशेने जावे याचा विचार या दिवशी करणे आवश्यक आहे. वारसा हा केवळ भूतकाळाचा ठेवा नसून तो आपल्या भविष्याचा मार्गदर्शक आहे. त्यामुळे त्याचे जतन करणे ही आपल्या अस्तित्वाशी निगडित जबाबदारी आहे.आजच्या पिढीसमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे आधुनिकतेच्या प्रवाहात आपली सांस्कृतिक ओळख टिकवून ठेवणे. जागतिकीकरणामुळे विविध संस्कृतींचा प्रभाव वाढत असताना आपली परंपरा आणि मूल्ये जपणे अधिक कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत वारसा हा आपल्या ओळखीचा आधार ठरतो. त्यामुळे वारसा जतन करणे म्हणजे केवळ इतिहास जपणे नव्हे, तर आपल्या अस्तित्वाचे रक्षण करणे होय.शेवटी असे म्हणता येईल की जागतिक वारसा दिन हा आपल्याला आपल्या भूतकाळाशी जोडणारा, वर्तमानाला दिशा देणारा आणि भविष्याला प्रेरणा देणारा एक महत्त्वपूर्ण दिवस आहे. या निमित्ताने आपण सर्वांनी वारसा जतनाची प्रतिज्ञा करावी आणि आपल्या कृतीतून त्याची अंमलबजावणी करावी. कारण जे समाज आपला वारसा जपतात, तेच समाज खऱ्या अर्थाने समृद्ध आणि सक्षम बनतात. वारसा हा आपल्या पूर्वजांनी दिलेला अमूल्य ठेवा आहे आणि तो पुढील पिढ्यांसाठी जतन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra५@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002